

# भूगोल-अर्थशास्त्र, लेख-११

**सदाशिव पाटील,** शाळा : बालमोहन विद्यामंदिर, दादर

**पूर्वपरिक्षा नमुना उत्तर पत्रिका**

**१) (अ) कंसात दिलेल्या पर्यायांपैकी योग्य तो पर्याय निवडून विधाने पूर्ण करा**

१) पठारी प्रदेशात खनिज संसाधने विपुल प्रमाणात असतात.
२) पंजाबमधील निलीरावी म्हशी दूध उत्पादनासाठी प्रसिद्ध आहेत.
३) भारतात सर्वात कमी लोकसंख्या सिक्कीम राज्यात आहे.

**ब) योग्य जोड्या पुढीलप्रमाणे-**

| स्तंभ 'क' | स्तंब 'ख' |
|---|---|
| १) मँगनीज | ब्लीचिंग पावडर |
| २) शिसे | दारुगोळा |
| ३) बॉक्साईट | ॲल्युमिनिअम |

**२) अ) भौगोलिक कारणे लिहा.**

१) ● एका राष्ट्राचा इतर राष्ट्रांबरोबर होणारा व्यापार म्हणजे आंतरराष्ट्रीय व्यापार.
● यामध्ये आयात व्यापार व निर्यात व्यापार हे दोन विभाग आहेत.
● भारत आपल्या गरजा भागविण्यासाठी खनिज तेल, इलेक्ट्रिक उत्पादने, खते, रसायने, सोने, चांदी, यंत्रे इत्यादींची आयात करतो.
● त्याचबरोबर कृषी उत्पादने, कापड, सागरी उत्पादने, खनिजे, चामड्याच्या वस्तू, चहा, कॉफी, मसाल्याचे पदार्थ इत्यादींची निर्यात करतो.
● आयात व निर्यात आंतरराष्ट्रीय व्यापारात अनेक प्रकारे फायद्याची ठरते. म्हणून देशाच्या आर्थिक विकासात आंतरराष्ट्रीय व्यापार फायद्याचा आहे.

**२ उत्तर :** ● भारत मोठ्या प्रमाणात परदेशातून खनिज तेलाची आयात करतो. ही आयात सागरी मार्गाने होते.
● खनिज तेल किनाऱ्यावरच शुद्ध केल्याने वाहतुकीचा खर्च कमी होतो.
● तसेच ते शीघ्र ज्वालाग्राही असल्याने अंतर्गत भागात वाहून नेणे धोक्याचे असते. म्हणून भारतात तेलशुद्धीकरणाचे कारखाने किनाऱ्यालगत आहेत.

३) **उत्तर :** ● भारतात बहुतांश साखर उत्पादन उसापासूनच होते.
● ऊस वाहतुकीचा खर्च साखर वाहतुकीच्या खर्चापेक्षा जास्त आहे.
● ऊस तोडणीनंतर शक्य तितक्या लवकर कारखान्यात गाळल्यास साखरेचा उतारा अधिक येतो. म्हणून साखर कारखाने ऊस उत्पादक क्षेत्राजवळ असतात.

**(ब) टिपा लिहा**

**१) राखीव वने-**
● लाकूड किंवा इतर उत्पादनांसाठी कायम स्वरूपात राखून ठेवलेले क्षेत्र म्हणजे 'राखीव वने' होय.
● या वनात क्वचित प्रसंगी पशूंना चरण्यासाठी आणि शेतीसाठी परवानगी दिली जाते. भारतातील एकूण वनक्षेत्रांपैकी सुमारे ५५ टक्के क्षेत्र राखीव वनांचे आहे.

**२) कुक्कुटपालन-**
● मांस व अंडी उत्पादनासाठी कुक्कुटपालन हा व्यवसाय केला जातो. जगात अंड्यांच्या उत्पादनात भारताचा पाचवा क्रमांक लागतो. हा व्यवसाय शेतीला पूरक असा आहे.
● आंध्र प्रदेश, पश्चिम बंगाल, तमिळनाडू, महाराष्ट्र, पंजाब आणि केरळ या राज्यांत हा व्यवसाय विकसित झाला आहे.

**३) मानवकृत संसाधने -** मानव आपल्या गरजांच्या पूर्ततेसाठी आपल्या कृतींतून ज्या साधनांची निर्मिती करतो त्यांना मानवकृत संसाधने किंवा सांस्कृतिक संसाधने म्हणतात. विविध प्रकारची यंत्रे, अवजारे, इमारती, वाहतूक व संदेश वहनाची साधने, विज्ञान व तंत्रज्ञान, तसेच सामाजिक, आर्थिक घटक इत्यादी बाबींचा मानवकृत संसाधनात समावेश होतो.

**प्र. ३ (अ) दिलेल्या सांख्यिकीय माहितीच्या आधारे आलेख कागदावर साधा स्तंभालेख काढा.**




**३. (ब) दिलेल्या आकृतीचे वाचन करून त्यासंबंधी प्रश्नांची उत्तरे लिहा.**

१) २०.१ ते ४० टक्के
२) हिमाचल प्रदेश, उत्तरांचल
३) ४०.१ ते ६० टक्के
४) पश्चिम बंगाल

**(क) भारताच्या नकाशा आराखड्यात पुढील घटक दाखवा; तसेच नावे द्या/ चिन्हांची सूची द्या.**




**प्र.४ पुढील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा.**

१) जलसिंचनामुळे झालेले फायदे पुढीलप्रमाणे.
● जलसिंचनामुळे कमी पावसाचे क्षेत्र लागवडीखाली आणता आले आहे.
● वर्षातून एकापेक्षा अधिक पिके घेता येणे शक्य झाले आहे.
● पारंपरिक पीक पद्धतीऐवजी शेतकरी नवीन व विविध पिकांची लागवड जलसिंचनामुळे करू लागले आहेत.
● जलसिंचनामुळे पीक सघनता वाढण्यास मदत झाली आहे. संकरित बियाण्यांचा व रासायनिक खतांचा वापर करणे शक्य झाले आहे. जलसिंचनामुळे दरहेक्टरी तसेच एकूण पिकांचे उत्पादन वाढले आहे.

**उद्याचा विषय : क्रमशः**

लोकसत्ता यशस्वी भव!
दहावी अभ्यास मालिका

**संपर्क :** yashasvibhava2007@gmail.com